गडचिरोली वनवृत्तातील ८ राजपत्रित व ११ अराजपत्रित अशी एकूण १९ अस्थायी पदे दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यत पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांक :- एफएसटी-०४/१६/प्र.क्र.११७/फ-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ मार्च, २०१९

<u>वाचा</u> :- १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष-३/योजनेतर/प्र.क्र.३०/१८-१९/२१५०, दि.२६.०२.२०१९
२) शासन निर्णय क्र.एफएसटी-०४/१६/प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि -२०१६ /प्र.क्र.८ /१६ /आ.पु.क.,दि.२१.०२.२०१९

<u>शासन निर्णय</u> :-

गडचिरोली (पूर्वीचे दक्षिण चंद्रपूर) वनवृत्तातील ८ राजपत्रित व ११ अराजपत्रित अशा एकूण १९ अस्थायी पदांना दि.०१.१०.२०१९ ते दि.२८.०२.२०१९ पर्यत संदर्भ क्रमांक-२ येथील शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

२. गडचिरोली (पूर्वीचे दक्षिण चंद्रपूर) वनवृत्तातील १९ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.१ अन्वये शासनास सादर केला आहे. आकृतिबंधातील एकूण २५०२५ पदांमध्ये या १९ अस्थायी पदांचा समावेश आहे.

३. उक्त परिस्थितीत गडचिरोली (पूर्वीचे दक्षिण चंद्रपूर) वनवृत्तातील १९ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. सदर मंजूरी वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे. वित्त विभागाने सदर शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्णयानुसार विहित कालावधीत कार्यवाही करावी.

४. सदरहू पदावर होणारा खर्च हा खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व त्याखालील सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

मुख्य वनसंरक्षक, गडचिरोली यांच्या कार्यालयातील :- ११ पदे

प्रधान शीर्ष	२४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर)
उपप्रधान शीर्ष	०१ वनीकरण
गौणशीर्ष	००१ संचालन व प्रशासन ०१ संचालन व प्रशासन
उपशीर्ष	(०१) (०२) प्रादेशिक संरक्षक, वेतने (२४०६ ००४२ ०१)

इतर ०८ पदे

प्रधान शीर्ष	२४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर)
उपप्रधान शीर्ष	०१ वनीकरण
गौणशीर्ष	१०१ वनसंधारण विकास व पुननिर्मिती (०१) प्रशासन व संरक्षण
उपशीर्ष	(०१) (०१) प्रशासन व संरक्षण (२४०६ ००९६ ०१)

५. शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ मधील तरतुदीनुसार विभागास असलेल्या प्राधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१११५२१४१९६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सोबत :- विवरणपत्र "अ"

Babasaheb S. Shinde

Digitally signed by Babasaheb S. Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1706e7b903eb05a5f1c405f3795499452af658b876e10b223a0cef893b6b6689, cn=Babasaheb S. Shinde
Date: 2019.03.11 15:24:48 +05'30'

(बा.सि.शिंदे)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति:-

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य-१/२ मुंबई/नागपूर.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३) सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) मुख्य वनसंरक्षक, गडचिरोली /चंद्रपूर.
५) विभागीय वन अधिकारी गडचिरोली/चंद्रपूर.
६) ब-१ कार्यासन, फ-२ कार्यासन, फ-८ कार्यासन, फ-७ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७) निवड नस्ती फ-४ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक:- एफएसटी-०४/१६/प्र.क्र.११७/फ-४, दि. ११.०३.२०१९

विवरणपत्र "अ"

गडचिरोली (पूर्वीचे दक्षिण चंद्रपूर) वनवृत्तातील ८ राजपत्रित व ११ अराजपत्रित अशा एकूण १९ अस्थायी पदे या योजनतंर्गत सन २०१९-२०२० मध्ये दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आलेल्या राजपत्रित व अराजपत्रित अस्थायी पदांची यादी

अ. क्र.	पदांचे नाव	अस्थायी पदांची संख्या	स्तंभ क्रमांक ३ मधील पद/ पदे ज्या शासकीय आदेशान्वये निर्माण केली त्या आदेशाचा क्रमांक आणि दिनांक	स्तंभ क्र. ३ मधील पद/ पदे २०१७-२०१८ यावर्षी ज्या शासकीय आदेशान्वये पुढे चालू ठेवली होती त्याचा क्रमांक आणि दिनांक
१	२	३	४	५
१	उप संचालक (कोर)	१	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१२५९/फ-१ दिनांक २७.११.१९८१	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
२	मुख्य वनसंरक्षक	१	एफडीएम-१८००/फ-२ दिनांक २९.८.१९८३ व शासन अधिसूचना क्रमांक भावसे/५००२/प्र.क्र.३५३/फ-७ दि. ११.६.२००४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
३	विभागीय वन अधिकारी	३	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१८८४/२८६८/ प्र.क्र. ४०/फ-२ दिनांक ०९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
४	सहाय्यक वनसंरक्षक	१	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१८८४/२८६८/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ०९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
५	उप अभियंता	१	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१८८४/२८६८/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ०९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
६	मुख्य लेखापाल	२	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१८८४/२८६८/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ०९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८

७	सहाय्यक वनसांख्यिक	१	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१८८४/२८६८/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ०९.४.१९८४ नुसार क.सा.सहा.पद निर्माण करण्यात आले होते.	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
८	वरीष्ठ सा.सहा.	१	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१८८४/२८६८/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ०९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
९	अनुरेखक	१	शा.नि.क्र.म.व.व.वि. एफडीएम-१८८४/२८६८/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ०९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
१०	डाकरनर	१	शा.नि.क्र.म.व.व.वि. टिआरएस-१०६५/१७८५७/वाय/ दि. ७.११.१९५७	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
११	आरेकस	१	भुतपूर्व मध्यप्रदेश शासन क्रमांक १९६७/६०८०/११दि. ९.४.१९५५	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
१२	मिश्रक	१	भुतपूर्व मध्यप्रदेश शासन क्रमांक १६७०/११३४/२ दि.७.६.१९४९	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
१३	वनसंरक्षक	१	एफडीएम-१८८०/फ-२ दिनांक २९.८.१९८३ व एफडीएम- १८८४/२८६७/ प्र.क्र.४०/फ-२,दि.९.४.१९८४ व शासन अधिसूचना क्रमांक भावसे/५००२/प्र.क्र.३५३/ फ-७ , दि. ११.६.२००४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
१४	मुख्य लेखापाल	१	एफडीएम-१८८०/फ-२ दिनांक २९.८.१९८३ व एफडीएम-१८८४/२८६७/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८

१५	वाणिज्य लेखापाल	१	एफडीएम-१८८०/फ-२ दिनांक २९.८.१९८३ व एफडीएम-१८८४/२८६७/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८
१६	दप्तरी	१	एफडीएम-१८८०/फ-२ दिनांक २९.८.१९८३ व एफडीएम-१८८४/२८६७/प्र.क्र.४०/फ-२ दिनांक ९.४.१९८४	शा.नि.क्र.एफएसटी-०४/१६/ प्र.क्र.११७/फ-४, दि.२४.१०.२०१८

****